सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्रमांक- विचौअ -१६२५/ प्र. क्र. ३४/ विचौ-२, दि.०७ /०८/२०२५.

**विषय** :- गट-अ आणि गट-ब संवर्गातील एकच ( Single) अपचारी असलेली विभागीय चौकशीची प्रकरणे कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिका-यांकडे सोपविण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, परिपत्रक क्रमांक- विचौअ -१६२५ / प्र. क्र. ३४ / विचौ -२, दि.०७ /०८/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०८०७१५२५३२९२०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन परिपत्रकानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 12-08-2025 21:54:09

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था/ नियोजन व समन्वय/आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गासह)

अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४.

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**गट-अ आणि गट-ब संवर्गातील एकच (Single)अपचारी असलेली विभागीय चौकशीची प्रकरणे कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांकडे सोपविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्र. विचौअ-१६२५/प्र.क्र.३४/विचौ-२**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**
**दि. ७ ऑगस्ट, २०२५**

**वाचा:-** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र: एसपीओ-२८०७/प्र.क्र.२१/०७/११-अ, दि.२८.१०.२००९
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. विचौअ १६१८/प्र.क्र.१२/११-अ, दि.२१.०५.२०१८
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.विचौअ-१६२५/प्र.क्र.०५/विचौ-२, दि.१३.०३.२०२५

**शासन परिपत्रक :-**

राज्यातील गट-अ (रु.७६०० पेक्षा कमी ग्रेड पे/सातव्या वेतन आयोगानुसार एस-२५ पेक्षा कमी वेतनस्तर असलेले) आणि गट-ब मधील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशा पूर्ण करण्यासाठी संदर्भ क्र.१ येथील दि.२८.१०.२००९ च्या शासननिर्णयान्वये महसूली विभागनिहाय ६ प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांची कार्यालये निर्माण करण्यात आली. तथापि, प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांची पदे काही काळ रिक्त राहिल्याने प्रकरणे प्रलंबित राहू लागली. चौकशी अधिकाऱ्यांची रिक्त पदे तसेच या कार्यालयांकडील प्रलंबित प्रकरणांची वाढती संख्या या बाबी विचारात घेऊन, गट-अ आणि गट-ब मधील राजपत्रित अधिकाऱ्यांची चौकशीची प्रकरणे हाताळण्यासाठी कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांची पूरक यंत्रणा संदर्भ क्र.२ येथील दि.२१.०५.२०१८ च्या शासन निर्णयान्वये निर्माण करण्यात आली.

२. शिस्तभंगविषयक कार्यवाहीतील विभागीय चौकशी पूर्ण करण्यासाठी "कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी" ही महत्वाची यंत्रणा आहे. तथापि, सद्यस्थितीत या यंत्रणेचा पुरेपुर वापर शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांकडून करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आले आहे. शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांकडून विभागीय चौकशीची बहुतांश प्रकरणे प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात येतात. त्यामुळे प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांकडील कामाचा भार वाढला असून, चौकशी प्रकरणे दिर्घकाळ प्रलंबित राहत आहेत. परिणामी, न्यायालयीन प्रकरणे उद्भवत आहेत.

३. या पार्श्वभूमीवर, कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी यंत्रणेच्या सक्षमीकरणासंदर्भातील सूचना संदर्भ क्र.३ येथील दि.१३.०३.२०२५ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यात विहित निकषांनुसार कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांच्या नविन याद्या प्रसिध्द करण्यात येत आहेत.

विभागीय चौकशी प्रकरणे विहित कालमर्यादेत पूर्ण होण्याच्या अनुषंगाने **गट-अ** (रु.७६०० पेक्षा कमी ग्रेड पे/सातव्या वेतन आयोगानुसार एस-२५ पेक्षा कमी वेतनस्तर असलेले) **आणि गट-ब मधील राजपत्रित अधिकाऱ्यांच्या विभागीय चौकशी प्रकरणांसंदर्भात पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-**

१) पुढील आदेश होईपर्यंत, एक (single) अपचारी असलेली, प्रशासकीय अनियमिततेची (उदा. अनधिकृत रजा, वरिष्ठांच्या आदेशांचे पालन न करणे, बदलीच्या पदावर हजर न होणे, कर्तव्यात कसूर करणे इ.) प्रकरणे यापुढे फक्त कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांकडे सोपविण्याची बाब **अनिवार्य करण्यात येत आहे.**

२) **हे आदेश दि.०१.०९.२०२५ पासून लागू होतील**. या दिनांकापासून, ज्या विभागीय चौकशी प्रकरणांत अद्याप चौकशी अधिकारी नियुक्त केलेले नाहीत, अशी, एकच अपचारी असलेली प्रशासकीय अनियमिततेची प्रकरणे **केवळ कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात यावीत.**

३) ज्या प्रकरणांत एकच अपचारी अधिकारी आहे, अशी प्रशासकीय अनियमितते व्यतिरिक्त इतर सर्व प्रकरणे, जसे लाचलुचपत,आर्थिक अपहार, शासनाचे आर्थिक नुकसान इ. प्रकरणे प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात यावीत.

४)एकापेक्षा जास्त अपचारी अधिकारी/कर्मचारी समाविष्ट असलेली (एकत्रित कार्यवाहीची) सर्व प्रकरणे (प्रशासकीय अनियमिततेसह) प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात यावीत.

५) अपवादात्मक परिस्थितीत, संबंधित महसूली विभागात कंत्राटी तत्वावरील पुरेसे चौकशी अधिकारी उपलब्ध नसल्यास, एकच अपचारी असलेले प्रशासकीय अनियमिततेचे चौकशी प्रकरण संबंधित प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकाऱ्याकडे सोपविता येईल.

६) कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकाऱ्यांची महसुली विभागनिहाय यादी तसेच त्यांच्याकडे सुरु असलेल्या चौकशी प्रकरणांची संख्या DE Module च्या "Inquiry Officer Details" या sheet मध्ये दर्शविण्यात आली आहे. त्यानुसार चौकशी अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यापूर्वी, त्यांच्याकडे किती प्रकरणे सुरु आहेत, त्याबाबतची माहिती घेऊन, ज्या चौकशी अधिकाऱ्याकडे १२ प्रकरणांच्या मर्यादेत, कमीत कमी चौकशी प्रकरणे सुरु असतील, त्यांना चौकशी अधिकारी म्हणून नियुक्त करावे.

७)वरीलप्रमाणे चौकशी अधिकाऱ्याच्या नियुक्तीचे आदेश काढते वेळीच, DE Module मध्ये त्यांच्या नियुक्तीची (सादरकर्ता अधिकाऱ्याच्या नोंदीसह) नोंद घ्यावी, जेणेकरुन इतर विभाग/कार्यालये/शिस्तभंगविषयक प्राधिकारी यांना संबंधित चौकशी अधिकाऱ्याकडे नेमकी किती प्रकरणे सुरु आहेत, त्याबाबतची अद्ययावत माहिती/संख्या कळू शकेल.

८) गट-अ आणि गट-ब च्या सध्याच्या यादीतील चौकशी अधिकाऱ्यांकडे आता जी प्रकरणे सुरु आहेत, ती त्यांनी विहित कालमर्यादेत पूर्ण करावीत. दिनांक ०१.०९.२०२५ नंतर नविन याद्यांतील सर्व चौकशी अधिकाऱ्यांनी एकच (single) अपचारी असलेली, प्रशासकीय अनियमिततेची प्रकरणे स्विकारावीत. त्याव्यतिरिक्त इतर प्रकरणे पुढील आदेशापर्यंत स्विकारु नयेत.

४. गट-क आणि गट-ड ची सर्व चौकशी प्रकरणे कंत्राटी तत्वावरील चौकशी अधिकारी यंत्रणेकडे सोपविण्याबाबतची सध्याची कार्यपध्दती पूर्वीप्रमाणेच सुरु राहील.

५. वरीलप्रमाणे देण्यात आलेल्या सूचनांचे सर्व शिस्तभंगविषयक प्राधिकाऱ्यांनी तसेच सर्व चौकशी अधिकाऱ्यांनी काटेकोरपणे पालन करावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०८०७१५२५३२९२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SUCHITA MOHAN MAHADIK

Digitally signed by SUCHITA MOHAN MAHADIK
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=6578e224c4a0d2c9bfb7e7e33b474757c1425d0a03e653bc4f0a25b70698158e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E146A6DDC8FB6681D49A5099661D41639DA6C568419F071BB9CDFD8A2E08058C, cn=SUCHITA MOHAN MAHADIK
Date: 2025.08.07 15:26:21 +05'30'

**(सुचिता महाडिक)**
**सह सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/सचिव
३. मा.उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे सचिव,
४. मा.उपमुख्यमंत्री (न.वि.वि.) यांचे सचिव,
५. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव,
६. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव,
७. मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव,
८. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव,
९. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा,
१०. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद,
११. सर्व मा. विधीमंडळ सदस्य,
१२. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
१३. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव/ सचिव,
१४. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
१५. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१६. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
१७. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
१८. प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई,
१९. मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर /औरंगाबाद
२०. प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई
२१. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
२३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
२४. सर्व विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
२५. प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी, कोकण/पुणे/ नागपूर/ छ.संभाजीनगर / नाशिक/ अमरावती
२६. कंत्राटी तत्वावरील सर्व चौकशी अधिकारी (गट -अ, ब, क-ड पॅनल) सामान्य प्रशासन विभाग.
२७. सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालयीन विभागाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख
२८. निवडनस्ती (विचौ-२)